# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास
# महामंडळ मर्यादित

म.रा.र.वि.म.

क्र. मरारविम/०१/प्रशासन/ ८४८८(क)

दि. 11 NOV 2022

कार्यालयीन आदेश क्र: ४०६९

विषय: माहितीचा अधिकार अधिनियम-२००५.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातील "जन माहिती अधिकारी" तसेच "प्रथम अपिलीय अधिकारी" यांची नियुक्ती करण्याबाबत..

संदर्भ: १) कार्यालयीन आदेश क्र. मरारविम/०१/प्रशासन/६७५(कार्यालयीन आदेश क्र.८४), दि. ०२.०२.२०२२.
२) क्र.मरारविम/०१/प्रशासन/०२/१९५,दि.२८.०३.२०२२ रोजीचे शुध्दीपत्रक.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (१) नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्याच्या प्रत्येक प्रशासकीय घटकामध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढया जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना राज्य जन माहिती अधिकारी म्हणुन पदनिर्देशीत करावयाचे आहे. तसेच कलम ५(२) नुसार उपविभागीय स्तरावर एखाद्या अधिकाऱ्यास सहाय्यक माहिती अधिकारी म्हणुन पदनिर्देशीत करावयाचे आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांसाठी उपरोक्त संदर्भाधीन कार्यालयीन आदेशांन्वये "सहाय्यक माहिती अधिकारी", "जन माहिती अधिकारी" व "प्रथम अपिलीय प्राधिकारी" यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यात दि.२८.०३.२०२२ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये सुधारणाही करण्यात आल्या आहेत.

आता महामंडळामार्फत प्रगतीत असलेल्या नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग व त्यास जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती मार्ग, प्रस्तावित नागपूर-गोंदिया-गडचिरोली समृध्दी जोडमहामार्ग इत्यादी प्रकल्पांच्या महामंडळाच्या मुख्यालयात असलेल्या नोडल अधिकाऱ्यांना जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार वरील कामांसाठीच्या महामंडळाच्या मुख्यालयातील संबंधित उप अभियंता, (नोडल) व कार्यकारी अभियंता, (नोडल) यांची अनुक्रमे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

नोंदणी शाखेतील आवक / जावक लिपिकास निर्देश देण्यात येत आहेत की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ तरतूदी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी व त्यामध्ये नोंद घेवून प्राप्त झालेले अर्ज सोबत जोडलेल्या यादीतील विषयाशी संबंधित जनमाहिती अधिकारी / अपिलीय अधिकाऱ्यांकडे परस्पर पाठवावेत.

कार्यालय प्रमुखांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल दरमहा प्रशासन शाखेकडे सादर करावा.

सदर आदेश महामंडळाचे संकेतस्थळ www.msrdc.in वर देखील उपलब्ध आहे.

सदर आदेश मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(सतिश भारतीय)
महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.

प्रति,

१) आदेशात नमूद सर्व कामांसाठीच्या समन्वय कक्षातील उप अभियंता, (नोडल) व कार्यकारी अभियंता, (नोडल) म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
२) सर्व संबंधित सहायक माहिती अधिकारी /जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
३) आवक / जावक लिपिक, (नोंदणी शाखा), मुख्य कार्यालय / शिबीर कार्यालय वांद्रे, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई .

प्रत:

१. मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई.
२. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. सह व्यवस्थापकीय संचालक (१/२/३), म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई.
४. सर्व विभाग प्रमुख, म.रा.र.वि.म. मर्या.
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई - ४०० ०५०.
६. सर्व शिबीर कार्यालये, म.रा.र.वि.म. मर्या.
७. प्रणाली प्रशासक, म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई - ४०० ०५०
त्यांना विनंती करण्यात येते की सदर कार्यालयीन आदेश महामंडळाच्या संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या शिर्षाखाली अंतर्भूत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.
८. निवड नस्ती.